नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 02/09/2020 (बुधवार)
(सायंकाळ)

---

## अपघातात मृत्यु

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 16 कि.मी. अंतरावरील मौजा निसतखेडा रोड चाचेर शिवार येथे दिनांक 31/09/2020 चे 18:30 वा. ते 18.45 वा. दरम्यान फिर्यादीचे मित्र नामे– 1) विजय अजबले व 2) दुर्गेश तितिरमारे रा. तुमसर, जि. भंडारा त्यांच्या एमएच– 31/एच– 3161 क्रमांकाच्या मोटरसायकलने निसदखेडा कडुन चाचेरकडे जात होते. त्यादरम्यान एमएच– 31/एच– 3161 क्रमांकाचा लाल रंगाच्या महिंद्रा कंपनीच्या ट्रॅक्टरचा चालक आरोपी नामे– चंद्रशेखर शेषराव कुथे, वय 30 वर्ष, रा. खोपडी, ता. मौदा याने चाचेर कडुन निसतखेडा कडे जातांना त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन त्यांचे मोटार सायकला समोरुन धडक दिली. या अपघातात 1) विजय अजबले व 2) दुर्गेश तितिरमारे हे दोघेही गंभीररित्या जखमी होवून त्यांचा जागीच मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– संदिप विठ्ठल हुमने, वय वर्ष, रा. मोहगाव खदान तुमसर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री कोळेकर 9834323960 हे करीत आहे.

## फसवणुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध कार्यवाही

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 3 कि मी अंतरावर रामाळेश्वर वार्ड रामटेक येथे दिनांक 30/08/2020 ते दिनांक 01/09/2020 चे 10.00 वा. ते 17.00 वा. सुमारास 18 वर्षीय फिर्यादी व तिची 17 वर्षीय मैत्रीण या दोघींचा अज्ञात आरोपीने ईन्स्टाग्रामवर फेक ईन्स्टाग्राम आयडी तयार करुन त्यावर अश्लील शब्दात चटींग केली व फिर्यादीचे मैत्रीणीचा मोबाईल क नमुद करुन त्याखाली अश्लील मंजकुर लिहुन मित्रांना पाठविला. तसेच आरोपीने फिर्यादीचे मैत्रीणीचा ईन्स्टाग्रामवरील आरोजनल आयडी हयाक करुन त्यावर सुद्धा अश्लील शब्दात चेटींग करुन फिर्यादीची व तिच्या मैत्रीणीची समाजात बदनामी केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपी विरुध्द कलम 500, 66(सी)67 माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री. दिलीप ठाकुर 9834094617 हे करीत आहे.

.
.
.
.
.
.
.

## . पाण्यात बुडुन मृत्यु

.

. पो. स्टे. नरखेड :– अंतर्गत 12 कि.मी. अंतरावर मौजा मोवाड येथे दिनांक 01/09/2020 चे 07.30 वा. ते 08.00 वा. दरम्यान अनिकेत केशव वाघे(मृतक), वय 19 वर्ष, रा. वार्ड क्र. 9, मोवाड हा जुनी वस्ती मोवाड येथील वर्धा नदीचे काठावर असलेल्या शिव मंदीरात पुजा अर्चना करण्यासाठी गेला होता. पुजा अर्चना करण्यापुर्वी मंदीरातील बादली घेवुन वर्धा नदीचे पाण्यात आंघोळ करण्यास गेला असता त्याला पाण्याचा अंदाज न समजल्याने तो खोल पाण्यात गेला त्याला पोहता येत नसल्याने तो पाण्यात बुडुन मरण पावला.

. सदर प्रकरणी फिर्यादी नामे– पांडुरंग लक्ष्मण वाघे, वय 47 वर्ष, रा. वार्ड क्र. 9 मोवाड यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस हवा श्री. शैलेश डोंगरदिवे हे करीत आहे.

.

## . अकस्मात मृत्यू

. पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत मौजा मालापुर शिवार नरखेड येथे दिनांक 31/01/2020 चे 18.00 वा. ते 21.00 वा. दरम्यान सुरेन्द्र रमेशराव टेंभेकर, वय 38 वर्ष, रा. धापेवाडा यांने अज्ञात कारणातुन विषारी औषध प्राशन केले. त्याची प्रकृती खराब झाल्याने उपचाराकरीता ग्रामीण रूग्णालय, काटोल येथे नेले असता उपचारापुर्वी त्याचा मृत्यू झाला. पो. स्टे. काटोल येथुन 00/2020 कलम 174 जाफौ चे संबधीत कागदपत्र प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

. सदर प्रकरणी फिर्यादी नामे– गुणवंता विनायक राऊत, वय 32 वर्ष, रा. मालापुर तह. नरखेड यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार धनराज भुक्ते हे करीत आहे.

.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर